# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०९/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ३०/०९/२०११ रोजी सभा सुचना क्र. १५ दि. २६/०९/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ३. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ७. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ८. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ९. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १०. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ११. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| १२. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| १३. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १४. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १५. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य – निरंक</u>**

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३०/०९/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १५, दि. २६/०९/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र.८१, दि. ०५/०७/२०११, दि. १६/०७/२०११ (दि. ०५/०७/२०११ ची तहकुब सभा), दि. १६/०७/२०११ व २६/०७/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजेश म्हात्रे :-**

दि.२६/०७/२०११ च्या इतिवृत्तांतामध्ये पान नं.१२ वर करणं हा शब्द आला आहे तर तिथे कारण हे वाक्य टाका घ्यायचं नव्हतं तर लिलाव करायचा तर तिथे का करायचा हे वाक्य पाहिजे.

**लक्ष्मण जंगम :-**

पान नं.२३ मध्ये ३-४ चुका आहेत.

**राजेश म्हात्रे :-**

सचिव साहेब पान नं.१४ मध्ये ५० हजार आहे. तिथे लाख केलेले आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, पान नं.२३ मध्ये प्रशिक्षणच घेत नाही. भरारी वगैरे पाहिजे विषय आहेत तर येणाऱ्या काळामध्ये पाहिजे इथे काळ्यामध्ये झालेलं आहे त्याच्यानंतर सर्वांसाठी अगदी शहर वासियांसाठी अतिशय घातक आहे तिथे देयाचं चे झालं आहे. येणाऱ्या काळामध्ये पाहिजे तर काळ्यामध्ये झालेलं आहे. काही अपघात शब्द आहे तिथे अपवाद टाईप झालेलं आहे. त्यांच्याकडुन योग्य काय होणाऱ्या ऐवजी जर काही चुकीचे झाले तर आलं तर असं म्हटलं आहे. तिथे झाले तर असं पाहिजे मात्र गालबोट म्हटलेलं आहे तिथे लालबोट झालेलं आहे. लागलेलं नाही त्याची आपण सफाई देतो त्याच्याकडुन लागलं तर काही.

**नगरसचिव :-**

पान चेक करुन घेतो.

**लक्ष्मण जंगम :-**

ठिक आहे वेळापर्यंत राहणार नाही तिथे वेगळा पर्यंत टाईप झालेलं आहे.

**शशिकांत भोईर :-**

पान नं.४ वर माझं संभाषण आहे ठराव आहे दुसरी लाईन सर्व्हे नं. नाही आणि त्याच ह्याच्यामध्ये चौथी लाईन आहे शास्ती लावा लावणार.

**भगवती शर्मा :-**

दि. ०५/०७/२०११, दि. १६/०७/२०११ (दि. ०५/०७/२०११ ची तहकुब सभा), दि. १६/०७/२०११ व २६/०७/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८१ :-**

दि. ०५/०७/२०११, दि. १६/०७/२०११ (दि. ०५/०७/२०११ ची तहकुब सभा), दि. १६/०७/२०११ व २६/०७/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७० :-**

दि. ०५/०७/२०११, दि. १६/०७/२०११ (दि. ०५/०७/२०११ ची तहकुब सभा), दि. १६/०७/२०११ व २६/०७/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.८२, राजीव आवास योजनेअंतर्गत तांत्रिक कक्ष स्थापन करणेबाबतच्या निविदेस मान्यता देणे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवागीने बोलतो खांबित साहेब गोषवारा बनवला आहे त्यामध्ये दुरुस्ती करुन घ्यायला लागेल २०१९ केलेले आहे तिथे २०११ पाहिजे आणि आपण काय स्थापन करण्यासाठी निविदा मान्यता देणार आहे तो कक्ष कोणत्या प्रकारचा असेल आणि त्याच्यातुन काय माहिती मिळेल याचं निवेदन केलं तर बर होईल.

**मा. आयुक्त :-**

मी थोडी पार्श्वभुमी सांगतो केंद्र शासनाकडुन एक नविन योजना येत आहे राजीव आवास योजना या योजनेचा उद्देश्य असा आहे की शहरात कोणतीही झोपडपट्टी नसली पाहिजे आणि जी झोपडपट्टी सध्या अस्तित्वात आहे त्या झोपडपट्टी लायक चांगला त्यांच पुर्नवसन झाले पाहिजे. शासनाकडुन अशी एक नविन योजना येत आहे यासाठी प्रिलिमनरी सर्व्हे करायचा आहे. सर्व्हेक्षणच काम करायच आहे. सध्या तुमच्याकडे किती झोपडपट्टी आहे किती लोकं राहत आहे कधीपासून राहत आहे? असा सर्व्हेक्षण करायचा आहे. सर्व्हेक्षणासाठी आम्ही एक कंपनी नेमलेली आहे वेब कॉस म्हणून आणि या सर्व्हेक्षणावर देखरेख करण्यासाठी आणि त्याच्यातुन जे काही इंन्फ्रन्ससेस कंन्क्लुशन काढायच्या आहे त्यासाठी असा एक सेल तयार करायचा आहे महापालिका स्तरावर या सेल मध्ये ५-६ प्रकारचे स्पेशालिस्ट असणार.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती महोदयाच्या परवानगीने बोलतो, या योजनेमध्ये ६ लोक टेक्नीकल सेल असणार आहे. एक असणार एम.आय. स्पेशालिस्ट, दुसरं जी.आय.एस. स्पेशालिस्ट, तिसरा टाऊन प्लानिंग स्पेशालिस्ट, स्पेशल डेव्हलपमेंट स्पेशालिस्ट, प्रोजेक्ट इंजिनिअरींग स्पेशालिस्ट आणि कॅपॅसिटी बिल्डींग/ट्रेनिंग को-ऑर्डीनेटर हा टेक्नीकल सेल आहे जे वेब कॉस कंपनी सगळा सर्व्हे करणार त्याचं हे सगळं केंद्र शासनाच्या राजीव आवास योजनेच्या गाईड लाईन्सप्रमाणे तो डीपीआर तयार करणे वेळोवेळी शासनाकडे हे करणं आपल्या महापालिका क्षेत्रात त्याच पूर्नवसन कसं तयार करता येईल ही सगळी माहिती तयार करुन हा म्हाडा तर्फे केंद्र शासनाकडे

प्रस्ताव पाठवायचा त्यासाठी हा सेल आहे आणि या सेलसाठी जो पगाराची रक्कम आहे ती शासनाकडुन आपल्याला महापालिकेकडे परिपूर्ती स्वरुपात मिळणार आहे.

**भगवती शर्मा :-**

दि. १२/०८/२०११ रोजीच्या दै. सामना या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार ई - टेंडरींग प्रक्रियेद्वारा प्राप्त व पात्र मे. व्ही.आर.पी. असोसिएशन यांचे आर्थिक (Price Bid) देकार उघडण्यात आले. सदर देकारानुसार कक्ष स्थापून आवश्यक विशेषज्ञ पुरविण्यासाठी मे. व्ही.आर.पी. असोसिएशन यांनी रू. ४,४०,४०४/- प्रति महिना एवढी बोली केली आहे. तथापी सदर दर जास्त असल्याने त्यांना दर कमी करण्यासाठी बोलविले असता त्यांनी रू. ३,६०,०००/- प्रति महीना या दराने काम करण्याचे मान्य केले आहे.

राजीव आवास योजने अंतर्गत प्राथमिक सर्व्हेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेसाठी याआधी मे. वाप्कोस लि. यांना दि. ०३/०८/२०११ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांचेवर देखरेख ठेवून ते काम पूर्ण करून घेणेकरीता तज्ञांची तातडीने गरज भासत आहे. तसेच राज्य व केंद्र शासनाकडून तांत्रिक कक्ष स्थापनेसाठी सतत पाठ पुरावा करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार राजीव आवास योजने अंतर्गत स्थापण्यात येणाऱ्या तांत्रिक कक्षासाठी येणारा खर्चाची शासनाकडून परिपूर्ती करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर मे. व्ही.आर.पी. असोसिएशन यांची रू. ३,६०,०००/- प्रति महिना याप्राप्त निविदेस BPMC Act 1949 Clause 73 (C) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**निर्मला सावळे :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य भगवती शर्मा साहब जी इसमे मुदत वगैरे कुछ दिया नही कितना महिना मिलेगा क्या है? किती वर्ष काम चालेल?

**शिवाजी बारकुंड :-**

मुदत म्हणजे राजीव आवास योजना पूर्व होईपर्यंत साधारणतः ३६ ते ६० महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. परंतु, संपूर्ण पैसे आपल्याला शासनाकडूनच येणार आहे आणि ती योजना झाली की हा सेल संपणार आहे.

**दिनेश नलावडे :-**

पण आपल्याला ह्याच्यात मुदत वगैरे टाकायची गरज आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

आवश्यकता नाही काम होईपर्यंत.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब हे सर्व्हेक्षण करण्याची काही मुदत आपल्याला दिली असेल ना पूर्ण शहरामध्ये ज्या झोपडपट्ट्या आहेत त्याच सर्व्हेक्षण करुन किती दिवसात आपण शासनाकडुन पाठवलं पाहिजे त्याच्याबद्दल काही माहिती असेल ना.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण ३ ऑगस्टला वेब कॉस कंपनीला सर्व्हे करण्याची ऑर्डर दिलेली आहे. सर्व्हे करण्याचं काम चालु झालेलं आहे आणि त्यांनी बारचार्ट पूर्ण होईल मग डीपीआर आणि सगळ्या गोष्टी तयार करण्याचं काम चालू होईल.

**प्रकरण क्र. ८२ :-**

राजीव आवास योजनेअंतर्गत तांत्रिक कक्ष स्थापन करणेबाबतच्या निविदेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ७१ :-**

दि. १२/०८/२०११ रोजीच्या दै. सामना या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार ई - टेंडरींग प्रक्रियेद्वारा प्राप्त व पात्र मे. व्ही.आर.पी. असोसिएशन यांचे आर्थिक (Price Bid) देकार उघडण्यात आले. सदर देकारानुसार कक्ष स्थापून आवश्यक विशेषज्ञ पुरविण्यासाठी मे. व्ही.आर.पी. असोसिएशन यांनी रू. ४,४०,४०४/- प्रति महिना एवढी बोली केली आहे. तथापी सदर दर जास्त असल्याने त्यांना दर कमी करण्यासाठी बोलविले असता त्यांनी रू. ३,६०,०००/- प्रति महीना या दराने काम करण्याचे मान्य केले आहे.

राजीव आवास योजने अंतर्गत प्राथमिक सर्व्हेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेसाठी याआधी मे. वाप्कोस लि. यांना दि. ०३/०८/२०११ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांचेवर देखरेख ठेवून ते काम पूर्ण करून घेणेकरीता तज्ञांची तातडीने गरज भासत आहे. तसेच राज्य व केंद्र शासनाकडून तांत्रिक कक्ष स्थापनेसाठी सतत पाठ पुरावा करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार राजीव आवास योजने अंतर्गत स्थापण्यात येणाऱ्या तांत्रिक कक्षासाठी येणारा खर्चाची शासनाकडून परिपूर्ती करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर मे. व्ही.आर.पी. असोसिएशन यांची रू. ३,६०,०००/- प्रति महिना याप्राप्त निविदेस BPMC Act 1949 Clause 73 (C) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.८३, त्रयस्थ संस्थेकडे तांत्रिक लेखापरिक्षण (Thrid Party Technical Audit) करुन घेण्याच्या दरांना मान्यता देणे.

**भगवती शर्मा :-**

दि. १८/०८/२०११ रोजीच्या दै. लोकमत / दै. टाईम्स ऑफ इंडिया, वृत्तपत्रात ई - टेडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

दि. १८/०८/२०११ रोजीच्या दै. लोकमत / दै. टाईम्स ऑफ इंडिया

| अ.क्र. | कामाचे नांव A ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकास कामांची त्र्ययस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण (Thrid Party Technical Audit) करून घेणेबाबत. |

| | | मे. भाऊसाहेब वर्तक पॉलटेक्नीकल | मे. इंडियन रजिस्टर ऑफ शिपींग | मे. वाप्कोस लिमिटेड |
|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Estimated Cost of Work** | **Consultancy Fees in Percentage of Estimated Cost** | **Consultancy Fees in Percentage of Estimated Cost** | **Consultancy Fees in Percentage of Estimated Cost** |
| 1 | Up to 5.00 Lakh | 2.00 | 2.00 | 2.15 |
| 2 | 5 Lakh to 10.00 Lakh | 1.75 | 5.5 | 1.75 |
| 3 | 10 Lakh to 20.00 Lakh | 1.50 | 5.5 | 1.25 |
| 4 | 20 Lakh to 50.00 Lakh | 1.25 | 5.00 | 0.90 |
| 5 | Above 50.00 Lakh | 1.00 | 5.00 | 0.79 |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ करीता मे. भाउसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक व मे. इंडीयन रजिस्टर ऑफ शिपिंग यांचे दर कमी आहेत. अ.क्र. २ करीता मे. भाउसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक व मे. वाप्कोस लि. यांचे दर कमी आहेत. अ.क्र. ३,४ व ५ करीता मे. वाप्कोस लिमिटेड यांचे दर कमी आहेत. तरी मे. भाउसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक व मे. वाप्कोस लिमिटेड यांना दर कमी करण्याकरीता बोलविण्यात आले होते. वरील विषयाबाबत सर्वात कमी दर सादर केलेल्या एजन्सीना दर वाटाघाटीसाठी बोलविले असता सर्वात कमी दर सादर केलेल्या एजन्सीने खालीलप्रमाणे दर कमी केले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) Up to 5.00 Lakh | मे. भाऊसाहेब वर्तक पॉलिटेक्निक | १.५० % |
| | मे. इंडीयन रजिस्टर ऑफशिपिंग | २.०० % |
| २) 5 Lakh to 10.00 Lakh | मे. भाऊसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक | १.२५ % |
| | मे. वाप्कोस लिमिटेड | १.४४ % |
| ३) 10 Lakh to 20.00 Lakh | मे. वाप्कोस लिमिटेड | १.१४ % |
| ४) 20 Lakh to 50.00 Lakh | मे. वाप्कोस लिमिटेड | ०.७९ % |
| ५) Above 50.00 Lakh | मे. वाप्कोस लिमिटेड | ०.४९ % |

वरीलप्रमाणे कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चानुसार प्रत्येक कामी करावयाच्या लेखापरीक्षणाची संख्या निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी अ.क्र. १ करीता १, अ.क्र. २ करीता २, अ.क्र. ३ करीता ३, अ.क्र. ४ करीता ४ व अ.क्र. ५ मधील कामासाठी १ लेखापरीक्षण प्रति महिना करून घेणे एजन्सीस बंधनकारक राहील. वरीलप्रमाणे अ.क्र. १ व २ करीता मे. भाउसाहेब वर्तक पॉलिटेक्नीक व अ.क्र. ३ ते ५ करीता मे. वाप्कोस लिमिटेड यांचे दर कमी आहेत. सदर दराना मा. स्थायी समितीची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नूसार मान्यता देण्यात येत आहे. सदर एजन्सीबरोबर योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यात यावा. सदर दर हे तीन वर्ष मुदतीकरीता राहतील.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८३ :-**

त्रयस्थ संस्थेकडे तांत्रिक लेखापरिक्षण (Thrid Party Technical Audit) करुन घेण्याच्या दरांना मान्यता देणे.

**ठराव क्र. ७२ :-**

दि. १८/०८/२०११ रोजीच्या दै. लोकमत / दै. टाईम्स ऑफ इंडिया, वृत्तपत्रात ई - टेडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

दि. १८/०८/२०११ रोजीच्या दै. लोकमत / दै. टाईम्स ऑफ इंडिया

| अ.क्र. | कामाचे नांव A ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकास कामांची त्र्ययस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण (Thrid Party Technical Audit) करून घेणेबाबत. |

| | | मे. भाऊसाहेब वर्तक पॉलटेक्नीकल | मे. इंडियन रजिस्टर ऑफ शिपींग | मे. वाप्कोस लिमिटेड |
|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Estimated Cost of Work** | **Consultancy Fees in Percentage of Estimated Cost** | **Consultancy Fees in Percentage of Estimated Cost** | **Consultancy Fees in Percentage of Estimated Cost** |
| 1 | Up to 5.00 Lakh | 2.00 | 2.00 | 2.15 |
| 2 | 5 Lakh to 10.00 Lakh | 1.75 | 5.5 | 1.75 |
| 3 | 10 Lakh to 20.00 Lakh | 1.50 | 5.5 | 1.25 |
| 4 | 20 Lakh to 50.00 Lakh | 1.25 | 5.00 | 0.90 |
| 5 | Above 50.00 Lakh | 1.00 | 5.00 | 0.79 |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ करीता मे. भाउुसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक व मे. इंडीयन रजिस्टर ऑफ शिपिंग यांचे दर कमी आहेत. अ.क्र. २ करीता मे. भाउुसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक व मे. वाप्कोस लि. यांचे दर कमी आहेत. अ.क्र. ३,४ व ५ करीता मे. वाप्कोस लिमिटेड यांचे दर कमी आहेत. तरी मे. भाउुसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक व मे. वाप्कोस लिमिटेड यांना दर कमी करण्याकरीता बोलविण्यात आले होते. वरील विषयाबाबत सर्वात कमी दर सादर केलेल्या एजन्सीना दर वाटाघाटीसाठी बोलविले असता सर्वात कमी दर सादर केलेल्या एजन्सीने खालीलप्रमाणे दर कमी केले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) Up to 5.00 Lakh | मे. भाऊसाहेब वर्तक पॉलिटेक्निक | १.५० % |
| | मे. इंडीयन रजिस्टर ऑफशिपिंग | २.०० % |
| २) 5 Lakh to 10.00 Lakh | मे. भाऊसाहेब वर्तक पॉलीटेक्नीक | १.२५ % |
| | मे. वाप्कोस लिमिटेड | १.४४ % |
| ३) 10 Lakh to 20.00 Lakh | मे. वाप्कोस लिमिटेड | १.१४ % |
| ४) 20 Lakh to 50.00 Lakh | मे. वाप्कोस लिमिटेड | ०.७९ % |
| ५) Above 50.00 Lakh | मे. वाप्कोस लिमिटेड | ०.४९ % |

वरीलप्रमाणे कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चानुसार प्रत्येक कामी करावयाच्या लेखापरीक्षणाची संख्या निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी अ.क्र. १ करीता १, अ.क्र. २ करीता २, अ.क्र. ३ करीता ३, अ.क्र. ४ करीता ४ व अ.क्र. ५ मधील कामासाठी १ लेखापरीक्षण प्रति महिना करून घेणे एजन्सीस बंधनकारक राहील. वरीलप्रमाणे अ.क्र. १ व २ करीता मे. भाउुसाहेब वर्तक पॉलिटेक्नीक व अ.क्र. ३ ते ५ करीता मे. वाप्कोस लिमिटेड यांचे दर कमी आहेत. सदर दराना मा. स्थायी समितीची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नूसार मान्यता देण्यात येत आहे. सदर एजन्सीबरोबर योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यात यावा. सदर दर हे तीन वर्ष मुदतीकरीता राहतील.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा**　　　**अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८४, नगररचना विभागात प्राप्त होणाऱ्या बांधकाम परवानगी, जोत्याचे दाखले व पूर्णत्वाची प्रमाणपत्रे प्रकरणांच्या संगणकीय व ऑनलाईन छाननीकरिता ऑटो - डी सी आर ही संगणक आज्ञावली मे. सॉफ्टटेक इंजिनिअर्स प्रा. लि. यांचेकडून थेट खरेदी करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, हा विषय आणलेला आहे. प्रकरण क्र.८४ तर प्रशासनाने याच्याबद्दल माहिती दिली तर आम्हाला बरं पडेल की कोणत्या पध्दतीचं असेल? संपूर्ण ऑनलाईन आहे ना कागदपत्र स्कॅनिंग वगैरे कसं काय त्याची माहिती दिलं तर बर होईल.

**मा. आयुक्त :-**

या विषयावर मी थोडी पार्श्वभुमी सांगतो. जे.एन.एन.यु.आर.एम. प्रोग्राम मी बघतो. त्याच्यामध्ये अट अशी आहे की आम्ही लोकांकडुन जे ड्रॉईंग्ज घेतो. सॅन्शनिंग साठी बिल्डींग ड्रॉईंग्ज ते आम्ही फिजीकली न घेता ऑनलाईन घेतली पाहिजे आणि ऑनलाईन घेतल्यानंतर ते स्वतःहून चेक झाली पाहिजे पूर्ण सॉफ्टवेअर मग त्याचे रिपोर्ट निघणार की या ड्रॉईंग्ज मध्ये ही ही चुक आहे आणि ती माणसाकडेच दिली पाहिजे म्हणून आम्ही हे सॉफ्टवेअरचा प्रस्ताव आम्ही टाकलेला आहे. याच्यामध्ये जे ड्रॉईंग्ज सबमिट होणार आहे बिल्डींग परमिशनची ते स्वतःहून चेक होणार आणि त्याचे स्वतःहून एक रिपोर्ट निघणार की या बिलामध्ये या या अडचणी आहे किंवा या या कमी आहेत मग ते पूर्त केल्यानंतर ड्रॉईंग परत चेक होणार त्यानंतर ते कंम्बाईन कडे जाणार म्हणून सगळे जे ड्रॉईंग्ज आहेत ते ऑनलाईन सबमिट केली पाहिजे. स्कॅन करुन नाही त्याचा एक स्पेशल फॉरमॅट असते ऑटो डीसीआर फॉरमॅट त्याच्यामध्ये ते ड्रॉईंग्ज सबमिट केली पाहिजे आणि ड्रॉईगज सबमिट केल्यानंतर ते स्वतःहून सॉफ्टवेअर चेक होणार असा हा सॉफ्टवेअर आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण कोणत्या सॉफ्टवेअर कंपनीला देतो आणि त्याचा फायदा काय आहे?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये फायदा असा होईल की, ऑनलाईन चेकींग होऊन जाईल माणसाची आणि त्यांना लवकर रिपोर्ट मिळेल काय चूक आहे ते त्यासाठी प्रति सॉफ्टवेअर दोन रुपये आम्ही सर्व्हिस चार्ज घेणार आहोत म्हणजे एक सॉफ्टवेअर ची किंमत त्याच्यातून निघेल.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांना ही एकदाच रक्कम द्यायची आहे की, त्यांना वार्षिक देखभाल दुरुस्ती वगैरे असं काही आहे?

**मा. आयुक्त :-**

दरवर्षी त्यांच जी एएमसी करावं लागेल त्याच्यामध्ये त्यांना १५ टक्के दरवर्षी द्यायला लागेल.

**शशिकांत भोईर :-**

मग, त्या सॉफ्टवेअर मध्ये चेंजेस वगैरे असतील तर...

**मा. आयुक्त :-**

ते स्वतःच करतील चेंजेस म्हणजे डी.सी.रुल चेंज झाले तरच चेंजेस होणार आमचे डीसी रुल चेंज झाले तरच सॉफ्टवेअरमध्ये चेंज होणार नाहीतर चेंज होणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

डी.सी. रुल पण टाकून देणार तुम्ही.

**मा. आयुक्त :-**

डी.सी.रुल मध्ये ड्राईंग चेक होणार ना.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास प्रस्तावांना परवानगी देणेबाबत “AUTO DCR” हे सॉफ्टवेअर विकसीत केलेले आहे. परंतु सदर प्रणालीमध्ये काही त्रुटी असल्याने सदर प्रणालीन्वये होणारे कामकाज बंद करण्यात आले होते.

मे. सॉफ्टेक एम्पावरींग ट्रान्सफॉरमेशन लि. यांचे कडून मिरा भाईंदर महानगरपालिका नगररचना विभागाकरीता AUTO DCR प्रणाली कार्यान्वित करणेकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

## Proposed SoftTech's Integrated Auto DCR Suite – Estimate of Fees

I Base License and deployment

| # | Item | No.of Licenses | Per Unit Rate (Rs.) | Estimated Fees in INR |
|---|---|---|---|---|
| 1 | Auto DCR Solution | 5 Licences for AutoDCR and web based for BPAMS | N/A | 31,00,000.00 |
| 2 | BPAMS Solution | | | |
| 3 | Detailed study of prevailing building proposal approval process flow and municipal Bylaws, rules and regulation | | | |
| 5 | Preparation of SRS Document | | | |
| 6 | Installation and commissioning of the solution | | | |
| 7 | Training to MBMC officials & Architects (2 days & 2 days respectively) | | | |
| | **Total** | | | **31,00,000.00** |
| 8 | Cost of the Pre-DCR software for architects | NA | Per License | 9,000.00 |
| 9 | Additional training if required on per man day basis | NA | Per Man / Per Day | 10,000.00 |
| 10 | Additional support required for implementation on per man month basis | NA | Per Man / Per Month | 50,000.00 |
| 11 | Cost of additional scope of work beyond SRS | NA | Per Man / Per Month | 80,000.00 |
| 12 | AMC for period of two years as a percentage of the AutoDCR project cost | NA | Per Annum | 15% |
| 13 | Cost of additional licence of AutoDCR | NA | Per Unit | 90,000.00 |

Note:

त्याप्रमाणे एकूण रू. ३३,३९,०००/– इतका खर्च अपेक्षित असलेबाबत कंपनी मार्फत सुचविण्यात आलेले आहे. याव्यतिरीक्त

१) कस्टमायझेशनचा खर्च वरील खर्चात अंतर्भुत आहे. याव्यतिरीक्त पहिल्या वर्षी वरील खर्चाच्या १५% खर्च हा Support करीता आवश्यक आहे ज्यात खालील बाबी असतील :

a. Supporting in smooth functioning of the applications
b. Fixing Bugs reported
c. Email based / Telephonic support on the usage / issues of the system.
d. Maintain rule database and implementation of changes in the values of the existing DC Regulations.
e. New rules are incorporated in the system will be done by Vendor during the maintenance period.

२) AutoDCR-BPAMS संगणकीय प्रणालीचे सर्व proprietary rights SoftTech Engineers Pvt. Ltd, यांचे असल्याने मूळ प्रणालीचे IP rights SoftTech यांचे कडे राहतील .

३) वरीलप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये संपुर्ण प्रणाली कार्यान्वित करणे करीता अंदाजे ३ ते ४ महिन्यांचा अवधी लागणार आहे.

४) याकरीता स्वतंत्ररीत्या रू.२/– प्रति चौ. मी. इतका सेवा आकार आकारण्यात येईल त्यामुळे संगणक आज्ञावली व ती हाताळण्याकरीता प्रशिक्षित कर्मचारी यावरील आवर्ती खर्चाप्रती बांधकाम परवानगी प्रकरणे सादर करणाऱ्या बांधकाम व्यावसायिक वा आर्किटेक्ट व इंजिनियर्स यांचे कडून वसुली झाल्यास संगणक आज्ञावलीचा वापर स्वयंपुर्ण होईल.

५) सदर प्रणाली राबविल्याने ज.नं.ना.रा.पु.यो. मधील महापालिकांतर्गत सुधारणेची पुर्तता होऊ शकेल. प्रकरण क्र. ५ च्या नियम २(२) च्या परंतुकानुसार निविदा न मागविता संविदा करण्यास ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ८४ :-**

नगररचना विभागात प्राप्त होणाऱ्या बांधकाम परवानगी, जोत्याचे दाखले व पूर्णत्वाची प्रमाणपत्रे प्रकरणांच्या संगणकीय व ऑनलाईन छाननीकरिता ऑटो - डी सी आर ही संगणक आज्ञावली मे. सॉफ्टटेक इंजिनिअर्स प्रा. लि. यांचेकडून थेट खरेदी करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास प्रस्तावांना परवानगी देणेबाबत “AUTO DCR” हे सॉफ्टवेअर विकसीत केलेले आहे. परंतु सदर प्रणालीमध्ये काही त्रुटी असल्याने सदर प्रणालीन्वये होणारे कामकाज बंद करण्यात आले होते.

मे. सॉफ्टेक एम्पावरींग ट्रान्सफॉरमेशन लि. यांचे कडून मिरा भाईंदर महानगरपालिका नगररचना विभागाकरीता AUTO DCR प्रणाली कार्यान्वित करणेकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

## Proposed SoftTech’s Integrated Auto DCR Suite – Estimate of Fees

I Base License and deployment

| # | Item | No.of Licenses | Per Unit Rate (Rs.) | Estimated Fees in INR |
|---|---|---|---|---|
| 1 | Auto DCR Solution | 5 Licences for AutoDCR and web based for BPAMS | N/A | 31,00,000.00 |
| 2 | BPAMS Solution | | | |
| 3 | Detailed study of prevailing building proposal approval process flow and municipal Bylaws, rules and regulation | | | |
| 5 | Preparation of SRS Document | | | |
| 6 | Installation and commissioning of the solution | | | |
| 7 | Training to MBMC officials & Architects (2 days & 2 days respectively) | | | |
| | **Total** | | | **31,00,000.00** |
| 8 | Cost of the Pre-DCR software for architects | NA | Per License | 9,000.00 |
| 9 | Additional training if required on per man day basis | NA | Per Man / Per Day | 10,000.00 |
| 10 | Additional support required for implementation on per man month basis | NA | Per Man / Per Month | 50,000.00 |
| 11 | Cost of additional scope of work beyond SRS | NA | Per Man / Per Month | 80,000.00 |
| 12 | AMC for period of two years as a percentage of the AutoDCR project cost | NA | Per Annum | 15% |
| 13 | Cost of additional licence of AutoDCR | NA | Per Unit | 90,000.00 |

त्याप्रमाणे एकूण रू. ३३,३९,०००/– इतका खर्च अपेक्षित असलेबाबत कंपनी मार्फत सुचविण्यात आलेले आहे. याव्यतिरीक्त

१) कस्टमायझेशनचा खर्च वरील खर्चात अंतर्भुत आहे. याव्यतिरीक्त पहिल्या वर्षी वरील खर्चाच्या १५% खर्च हा Support करीता आवश्यक आहे ज्यात खालील बाबी असतील :

a. Supporting in smooth functioning of the applications
b. Fixing Bugs reported

c. Email based / Telephonic support on the usage / issues of the system.
d. Maintain rule database and implementation of changes in the values of the existing DC Regulations.
e. New rules are incorporated in the system will be done by Vendor during the maintenance period.

२) AutoDCR-BPAMS संगणकीय प्रणालीचे सर्व proprietary rights SoftTech Engineers Pvt. Ltd, यांचे असल्याने मूळ प्रणालीचे IP rights SoftTech यांचे कडे राहतील .

३) वरीलप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये संपुर्ण प्रणाली कार्यान्वित करणे करीता अंदाजे ३ ते ४ महिन्यांचा अवधी लागणार आहे.

४) याकरीता स्वतंत्ररीत्या रू.२/– प्रति चौ. मी. इतका सेवा आकार आकारण्यात येईल त्यामुळे संगणक आज्ञावली व ती हाताळण्याकरीता प्रशिक्षित कर्मचारी यावरील आवर्ती खर्चाप्रती बांधकाम परवानगी प्रकरणे सादर करणाऱ्या बांधकाम व्यावसायिक वा आर्किटेक्ट व इंजिनियर्स यांचे कडून वसुली झाल्यास संगणक आज्ञावलीचा वापर स्वयंपुर्ण होईल.

५) सदर प्रणाली राबविल्याने ज.ने.ना.रा.पु.यो. मधील महापालिकांतर्गत सुधारणेची पुर्तता होऊ शकेल. प्रकरण क्र. ५ च्या नियम २(२) च्या परंतुकानुसार निविदा न मागविता संविदा करण्यास ही स्थायी समिती मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५, निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**भगवती शर्मा :-**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता ज्योती पार्क ते इंद्रलोक पोलिस चौकी रूंदीकरण करणे.<br>**1´ मे. गजानन कंस्ट्रक्शन**<br>२) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>३) मे. सुवर्णा इंटरप्रायजेस | रू. ३४,९१,५००/-<br><br>**1.00 ‰ कमी दराने**<br>3.5 ‰ जास्त दराने<br>5.00 ‰ जास्त दराने |

varIla tulanaa%mak t@ta phata zokodaraMnaI saadr kolaolyaa savaa-t kmaI dracyaa inaivada hyaa vaajavaI Aahot. trI A.Ë.1 cyaa kamaI मे. गजानन कंस्ट्रक्शन यांची AMdajap~kIya दरापेक्षा 1.00 ‰ कमी दराची निविदा असून सदर निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देखिल देण्यात येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ८५ :-**

निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ७४ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्ता ज्योती पार्क ते इंद्रलोक पोलिस चौकी रूंदीकरण करणे.<br>**1´ मे. गजानन कंस्ट्रक्शन**<br>२) मे. एम.एस. इंटरप्रायजेस<br>३) मे. सुवर्णा इंटरप्रायजेस | रू. ३४,९१,५००/-<br><br>**1.00 ‰ कमी दराने**<br>3.5 ‰ जास्त दराने<br>5.00 ‰ जास्त दराने |

varIla tulanaa%mak t@ta phata zokodaraMnaI saadr kolaolyaa savaa-t kmaI dracyaa inaivada hyaa vaajavaI Aahot. trI A.Ë.1 cyaa kamaI मे. गजानन कंस्ट्रक्शन यांची AMdajap~kIya दरापेक्षा 1.00 ‰ कमी दराची निविदा असून सदर निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देखिल देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ८६ अवलोकन आहे. अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८६ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे.

**ठराव क्र. ७५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प) अग्निशमन विभाग इमारत येथे विदयुत फिटींग करणे. | रू. ७१,२४०/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| २ | उत्तन स्मशानभूमी अंतर्गत विदयुत विषयक कामे करणे. | रू. ६८,७१९/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील जी.आर. टॉवर जवळील रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ९,९९,९००/- | मे. गणेश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील एस.के.स्टोन सिग्नल जवळील रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ९,९८,१००/- | मे. ओम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | भाईंदर (प) प्रभाग क्र. ३५ येथे ओमकार टॉवर ते राधा रमण टॉवर पर्यत गटार तयार करणे. | रू. ९,९९,०००/- | मे. श्री. सचिन काशिनाथ साळे रा.रूम नं. १०, गणेश दर्शन बिल्डींग, शिवाजी नगर रोड, बी कॅबीन नौपाडा ठाणे (प) जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | पेणकरपाडा खोडियार नगर मधील अंतर्गत रस्ते सी.सी. करून कोटा लादी बसविणे. | रू. ९,९४,०००/- | मे. श्री. सुजित सुधाकर राउत<br>रा. श्रमसाफल्य मु.पो. आगरवाडी ता. पालघर, जि.ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ७ | पेणकर येथील दत्त मंदिर पाठीमागील मुख्य नाल्यावर स्लॅब टाकणे. | रू. ६,९८,०००/- | मे. श्री शोहेब अकबर शेख, पालघर<br>रा. सफाळे उंबरपाडा, ता. पालघर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ८ | मिरारोड भारतरत्न इंदीरा गांधी रूग्णालय लिफ्टस वार्षिक मुदतीने देखभाल दुरूस्ती करणे | | मे. ओटीस इलेव्हेटर | कोटेशन दर |
| अ. | One (1) No. NE300VF PASSANGER ELEVATOR | रू. ७५,४८४/- | | |
| ब. | TWO(2) Nos. NE300AC 1 PASSANGER ELEVATOR | रू. ७०,४६८/- | | |
| ९ | भाईंदर (पुर्व) कनाकिया डी.पी. रस्त्यावरुन लक्ष्मी पार्ककडे जाणारा रस्ता दुरुस्ती करुन गटार बांधणे. | रु.९,९८,५००/- | मे. केशरीनंदन मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. मुरबाड, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १० | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील श्री. आसिफ पटेल यांच्या बंगल्या समोरील रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ९,९०,१००/- | मे. जनसेवा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. उल्हासनगर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा येथील सनराईज हॉटेल जवळील रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ९,९९,४००/- | मे. जनसेवा मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. उल्हासनगर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| १२ | मिरारोड आला हजरत इमाम अहमद रजा खॉ मैदानातील कुंपणभिंतीची उंची वाढविणे व सुशोभिकरणाची कामे करणे. | रू. ९,९८,५००/- | मे. कल्याणी मजुर कामगार सहकारी संस्था मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |

वरील पैकी अ.क्र. १ ते १२ या कामाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार व प्रकरण दोन (पाच) (पाच) अन्वये केल्याने सदर कामांचे अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शशिकांत भोईर :-**

२ के अन्वये प्रस्ताव - विषय :धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना तात्पुरत्या निवाऱ्याची सोय महानगरपालिकने करुन देणेबाबत.

**नगरसचिव :-**

हा विषयाला सगळ्यांची मान्यता आहे.

**स्नेहा पांडे :-**

इस विषय पर हमारा विरोध है।

**शशिकांत भोईर :-**

किसका विरोध है। नोंद किजीए। मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची (ड) प्रकरण २ नियमं १ पोटनियम (के) नुसार प्रस्ताव आहे. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये ज्या धोकादायक इमारती आहेत काही अति धोकादायक आहेत. त्याच्यामध्ये माझ्या वॉर्डमध्ये लता अपार्टमेंट कोसळली. त्यांच्या लोकांना तात्पुरती रहायची सोय. आता आयुक्तांनी म्हंटल, मध्ये मी निवेदन केल होत तेव्हा ऑन द रेकॉर्ड नव्हत की, सोय नाही. कुठे जागा उपलब्ध होईल. त्याबद्दलचा माझा प्रस्ताव आहे. तो (क) खाली घ्यायचा आहे.

**भगवती शर्मा :-**

घटना ऐसी है। सिर्फ लता अपार्टमेंट नही जितनी धोकादायक इमारती है, जिसको खाली कराते है। उन सभिको तात्पुर्ती व्यवस्था मतलब............

**शशिकांत भोईर :-**

निवेदन है।

**नगरसचिव :-**

या प्रकरणावर कोणाचा विरोध आहे का?

**स्नेहा पांडे :-**

हा हमारा विरोध है।

**भगवती शर्मा :-**

उसमे सभी का मेन्शन होना चाहिए।

**शशिकांत भोईर :-**

सबके लिए ना।

**भगवती शर्मा :-**

आप पर्टिक्युलर उल्लेख कर रहे है ना वह सब निकालो तो हम इस विषय को लेते है।

**मा. सभापती :-**

दोघांचा विरोध आहे. बाकिच्यांची संमती आहे.

**स्नेहा पांडे :-**

साहब, कल मा. महासभा मे यह विषय आया था। तभी आप लोगोने विरोध किया है।

**शशिकांत भोईर :-**

विरोध किया नही। वह प्रस्ताव................

**स्नेहा पांडे :-**

आपने विषय लेने नही दिया। आप लोगो ने ही विरोध किया था ना। यह जरूरत मंद लोगो के लिए जरूरत है। पता नही और ऐसे कितने धोकेदायक इमारत है। जो बहोत लोगो की जाने जा सकती है। इस विषय को मा. महासभा मे पहले ही विषय लाया गया था। तभी आप लोगो ने ही विरोध किया।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, यांनी विरोध दर्शवलेला आहे. कालच्या सभेत काय म्हणन होत ते कालच्या सभेत झाल. आजची ही सभा..........

**स्नेहा पांडे :-**

यह मा. महासभा मे विषय लाया था।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्या स्नेहा पांडे यांना काही म्हणायच असेल तर त्यांचे म्हणन ऐकून घ्या. आमच काही म्हणन नाही. त्यांच झाल असेल तर आम्ही बोलू.

**मा. सभापती :-**

तस घेवू या. पहिला आपण ठराव मांडा.

**शशिकांत भोईर :-**

मी त्याच्या अगोदर एक निवेदन मांडतो. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनेक धोकादायक इमारती आहेत. त्याच्यातुन आयुक्तांच्या म्हणण्यानुसार ६६ इमारती धोकादायक आहेत. त्यांनी आता लागलीच खाली पण केल्या. ही घटना कधी घडली जेव्हा लता अपार्टमेंन्ट बिल्डींगचे काही स्लॅब पडले. त्यामध्ये काही मृत झाले काही जखमी आहेत. अशा अवस्थेत आयुक्तांनी ताबडतोब निर्णय घेतला आणि धोकादायकची फाईल मागवली. आणि काय आहे ते त्याच्यात पुर्तता आहे. त्याच्यामध्ये उपाययोजना काय करायला पाहीजे. त्याबद्दल त्यांनी त्यांचा आढावा घेतलेला आहे. परंतु माझ अस म्हणन आहे की, अति धोकादायक इमारती आहेत ते अचानक खाली करतात. मग, त्या बिल्डींग मध्ये राहणारा रहिवाशी हा आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे नाही आहे याची कोणाजवळ वाच्यता नाही. त्याला ऑन द स्पाट आपण खाली केली तर त्याला रस्त्यावर रहायला लागते किंवा त्यांचे कोणी नातेवाईक असतील. किंवा मित्र असेल तात्पुर्ती सोय त्यांच्याकडे २ दिवसासाठी, १ दिवसासाठी किंवा आपली महापालिका प्रभाग कार्यालय मध्ये जागा देते किंवा समाज मंदिर असते तिथे देते. किंवा अन्य ठिकाणी हलवण्यासाठी तात्पुर्ती व्यवस्था करण्यासाठी माझा हा प्रस्ताव आहे. जर मी लता अपार्टमेन्टचा उल्लेख केला असेल तर मी लता अपार्टमेन्टचा उल्लेख न करता मी सर्व धोकादायक इमारती घेतो. माझे सभागृहाला अस म्हणन आहे की, ज्या धोकादायक इमारती आहेत आणि सध्या खाली झालेली लता अपार्टमेन्ट अणखिन २ इमारती झालेल्या आहेत. आपले आमदार मा. गिल्बर्टजी मेन्डोंसा यांनी आयुक्तांशी पत्र व्यवहार केलेला आहे. ट्रान्झींट कॅम्प पाहीजे. तद्नंतर माझा पण पत्र व्यवहार झालेला आहे. परंतु, कुठेतरी वाच्यता झाली पाहिजे. जर प्रशासनाजवळ आता आपण विचारणा केली की, कुठे-कुठे सोय आहे. तर प्रशासन आपल्याला सांगु शकते की, वेळेवर जर आपण विचरायला लागल, साहेब फाईल मध्ये बघायला लागेल. तेवढ त्यांच्यापण डोक्यत नसेल

कुठे-कुठे आहे ते? तर विचारणा करून कुठे-कुठे जागा उपलब्ध होतील. त्यांनी तात्पुर्त्या स्वरूपात म्हणजे २ ते ३ महिन्यासाठी व्यवस्था करावी असा माझा प्रस्ताव आहे. मी हा प्रस्ताव मांडतो. याच्यामध्ये जरी फक्त लता अपार्टमेन्टच नाव असल तर लता अपार्टमेन्ट धरून अन्य धोकादायक इमारती असतील............

**भगवती शर्मा :-**

तुम्ही लता अपार्टमेंन्टच नाव वगळून टाका.

**शशिकांत भोईर :-**

ठिक आहे. वगळून टाकतो, मी तुम्हाला एक माहीती देतो. माझ्या माहीतीप्रमाणे लता अपार्टमेन्टचे जेवढे फ्लॅटस् आहेत. तेवढेच मला माहीत आहे म्हणून मी त्याचा उल्लेख याच्यामध्ये केलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही त्याच्यामध्ये अस मेन्शन करा की, जे-जे धोकादायक इमारती आहेत त्याच्यासाठी.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही असं म्हणा. मिरा भाईंदर मधल्या ज्या-ज्या धोकादायक इमारतींची लिस्ट केलेली आहेत त्या आणि तशी लता अपार्टमेंटची दुर्घटना म्हटलं तसं तुम्ही म्हटलं तर ते काय वावगं ठरणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनेक इमारती धोकादायक व अती धोकादायक आहेत. अशा इमारतींमध्ये राहाणाऱ्या रहिवाश्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका व स्थानिक पोलिस स्टेशनद्वारे इमारती खाली करण्यासाठी सांगितले असता सर्व रहिवाश्यांना इमारत खाली केल्यामुळे अक्षरशः रस्त्यावर रहावे लागेल. त्यांचे संसार रस्त्यावर उघड्यावर पडून राहू नये. तत्कालीन ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि आता महानगरपालिकेचा कर भरणा करीत आहेत. या रहिवाश्यांना तात्पुरत्या स्वरुपात निवाऱ्याची सोय करणे अत्यंत गरजेचे असुन तसे न केल्यास भावनांचा उद्रेक होऊन अती गंभीर परिस्थिती होऊ शकते. महानगरपालिका ह्या रहिवाश्यांना तात्पुरत्या निवाऱ्याची सोय खाली प्रकारे करु शकते.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र. २२२ व २२२अ मध्ये हाऊस फॉर डिसहाऊस या योजनेअंतर्गत विकासकाकडून उपलब्ध झालेली घरे व रिकामी असलेली घरे या रहिवाश्यांसाठी उपलब्ध होऊ शकतात.

२) यु.एल.सी. कायद्या अंतर्गत ज्या विकासकर्त्यांनी शासनास यु.एल.सी. कोठ्या अंतर्गत रुम जमा करणे आहे. त्याला राज्य शासनाची मान्यता घेऊन ही घरे उपलब्ध होऊ शकतात.

३) ॲमिनेटी योजनेअंतर्गत समावेशक आरक्षण ज्या विकासकाने विकसित केले आहे व ज्या इमारती तयार होऊन महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या आहेत व हस्तांतरीत केलेल्या काही इमारतीत अद्याप महानगरपालिकेने वापर सुरु केला नाही अशा ठिकाणी या रहिवाश्यांची तात्पुरती सोय होऊ शकते. उदा. शांती गार्डन येथील सोशल सेंटर आणि प्रभाग क्र. ३ मधील मार्केट इमारत.

या रहिवाश्यांना प्राथमिक सोयी सुविधा उदा. पाणी, शौचालय, विज इत्यादी प्राधान्याने महानगरपालिकेने पुरवाव्यात.

वरील सर्व गोष्टींचा विचार करुन ज्या धोकादायक इमारती खाली करणार अशा राहिवाश्यांची तात्पुरत्या निवाऱ्याची सोय महानगरपालिकेने करावी, असा मी ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

मेरा अनुमोदन है।

**शशिकांत भोईर :-**

याच्यामध्ये कोणाला काही सुचना द्यायची असेल तर ते मांडू शकतात आणि मला प्रशासनाशी काही बोलायचं आहे जर प्रशासनाने त्याची माहिती दिली तर बरं होईल. त्यांच्या माहितीसाठी आणखीन दुसऱ्या काही योजना असतील तर त्या आम्हाला सांगावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

मा. आयुक्त साहेबांनी सुद्धा बोललेलं आहे. कलेक्टर कडून साहेबांच्या ते लँड लक्षात आहे. ते डीसी रुल झोन मध्ये आहेत ते बघणार आहे. दुसरं बी.एस.यु.पी ची योजना आहे त्यासाठी जागा मिळणार आहे. त्यासाठी रिहॅबीलीटेशन सेंटर तिथे काय मिळते ते बघणार आहे आणि हाऊस हे तीन पर्यायी ठिकाण साहेबांनी बघितलेलं आहे. तिघांपैकी कोणती ते साहेब फायनल करतील.

**भगवती शर्मा :-**

मै इसमे एक सुचना करना चाहता हूँ की जो विगत दिनों मे मंत्रालय मे मिटींग हूई थी की एक्झीस्टींग एफ.एस.आय.। एक एफ.एस.आय का ठराव लेके मंत्रालय मे भेजना था क्योकी, इसके लिए आगे के भी योजना करनी पडेगी ना। तो इसमे मेरी सुचना है की, जल्द से जल्द मा. महासभा मे विषय लेकर उस ठराव को मंजूरी दि जाए।

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, यांनी जी सुचना मांडली त्यांच तुम्ही वाचन करा आणि ताबडतोब पाठवा ना.

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब अपने मिरा भाईंदर शहर मे बहोत सारी धोकादायक इमारते है तो भगवान ना करे कभी ऐसी फिर दुर्घटना हो लेकीन अपने पास व्यवस्था क्या है? अपनी सदनिका है तो उसमे से कितनी खाली है क्या है उसकी जरा जानकारी देंगे तो बेहतर रहेगा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

फिलहाल अपने पास कुछ भी व्यवस्था नही है। एमरजन्सी आली तर तात्पूर्ती शाळेमध्ये व्यवस्था करतो.

**स्नेहा पांडे :-**

नगरपालिका के तरफ से ऐसी कोई भी व्यवस्था नही है तो यह व्यवस्था करने के लिए जो विषय है इसके लिए वॉर्डो की मान्यता लेनी चाहीए थी क्योकी कल विषय भी लाया था।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, कालच्या मा. महासभेमध्ये त्यांनी विषय आणला तो सर्वांनी ऐकला आजच्या वेळी आला आहे ते ही ऐकलं आहे...............

**स्नेहा पांडे :-**

यह विषय लाने के लिए (के) के अंडर जो विषय ला रहे है उसके लिए विरोध है। शहर वासियोंके लिए जरुरत है उनको ट्रांन्झीट कँम्प देना है। उनकी व्यवस्था करनी है उसके लिए हमारा कही भी विरोध नही है। आपसे पहले हमने विषय लाया की व्यवस्था की जाए। जो धोकादायक इमारते है। यह अधिकार जनरल बॉडी के है। अभी विशेष मा. महासभा लगाने वाले है तो तभी विषय लाईए।

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ‘‘ड’’ प्रकरण २ नियम १ पोटनियम ‘‘के’’ नुसार प्रस्ताव -- धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना तात्पुरत्या निवाऱ्याची सोय महानगरपालिकने करुन देणेबाबत.

**ठराव क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनेक इमारती धोकादायक व अती धोकादायक आहेत. अशा इमारतींमध्ये राहाणाऱ्या रहिवाश्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका व स्थानिक पोलिस स्टेशनद्वारे इमारती खाली करण्यासाठी सांगितले असता सर्व रहिवाश्यांना इमारत खाली केल्यामुळे अक्षरशः रस्त्यावर रहावे लागेल. त्यांचे संसार रस्त्यावर उघड्यावर पडून राहू नये. तत्कालीन ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि आता महानगरपालिकेचा कर भरणा करीत आहेत. या रहिवाश्यांना तात्पुरत्या स्वरुपात निवाऱ्याची सोय करणे अत्यंत गरजेचे असुन तसे न केल्यास भावनांचा उद्रेक होऊन अती गंभीर परिस्थिती होऊ शकते. महानगरपालिका ह्या रहिवाश्यांना तात्पुरत्या निवाऱ्याची सोय खाली प्रकारे करु शकते.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र. २२२ व २२२अ मध्ये हाऊस फॉर डिसहाऊस या योजनेअंतर्गत विकासकाकडून उपलब्ध झालेली घरे व रिकामी असलेली घरे या रहिवाश्यांसाठी उपलब्ध होऊ शकतात.
२) यु.एल.सी. कायद्या अंतर्गत ज्या विकासकर्त्यांनी शासनास यु.एल.सी. कोठ्या अंतर्गत रुम जमा करणे आहे. त्याला राज्य शासनाची मान्यता घेऊन ही घरे उपलब्ध होऊ शकतात.
३) ॲमिनेटी योजनेअंतर्गत समावेशक आरक्षण ज्या विकासकाने विकसित केले आहे व ज्या इमारती तयार होऊन महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या आहेत व हस्तांतरीत केलेल्या काही इमारतीत अद्याप महानगरपालिकेने वापर सुरु केला नाही अशा ठिकाणी या रहिवाश्यांची तात्पुरती सोय होऊ शकते. उदा. शांती गार्डन येथील सोशल सेंटर आणि प्रभाग क्र. ३ मधील मार्केट इमारत.

या रहिवाश्यांना प्राथमिक सोयी सुविधा उदा. पाणी, शौचालय, विज इत्यादी प्राधान्याने महानगरपालिकेने पुरवाव्यात.

वरील सर्व गोष्टींचा विचार करुन ज्या धोकादायक इमारती खाली करणार अशा राहिवाश्यांची तात्पुरत्या निवाऱ्याची सोय महानगरपालिकेने करावी, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शशिकांत भोईर :-**

एक शोक प्रस्ताव आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) वॉर्ड क्र.२ च्या विभागातील लता अपार्टमेंट या इमारती मधील स्लॅब कोसळून दि.२३/०९/२०११ रोजी सायं. दुर्घटना घडली त्यामध्ये ६ व्यक्ती मृत्यु झाल्या व चार व्यक्ती जखमी झाल्या मृत व्यक्ती पुढील प्रमाणे १) कु. शिल्पा डे, वय ५ वर्ष, २) कु. रंजना यादव, वय ६ वर्ष, ३) कु. सोनाली चंद्रपाल, वय २० वर्ष, ४) कु. नेत्रा रेडेकर, वय २५ वर्ष, ५) सौ. गायत्री यादव, वय २८ वर्ष, ६) श्री. राजेंद्र कुमार यादव, वय ३५ वर्ष यांच्या आत्म्यास चिरशांती मिळावी ही ईश्वर चरणी प्रार्थना असा मी शोक प्रस्ताव मांडत आहे त्यांना दोन मिनिटं श्रध्दांजलीसाठी उभे रहायचे.

**भगवती शर्मा :-**

अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

सगळ्यांनी दोन मिनिटं उभे राहून मृतात्म्यास श्रध्दांजली वहायची आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ७६अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) वॉर्ड क्र.२ च्या विभागातील लता अपार्टमेंट या इमारती मधील स्लॅब कोसळून दि.२३/०९/२०११ रोजी सायं. दुर्घटना घडली त्यामध्ये ६ व्यक्ती मृत्यु झाल्या व चार व्यक्ती जखमी झाल्या मृत व्यक्ती पुढील प्रमाणे १) कु. शिल्पा डे, वय ५ वर्ष, २) कु. रंजना यादव, वय ६ वर्ष, ३) कु. सोनाली चंद्रपाल, वय २० वर्ष, ४) कु. नेत्रा रेडेकर, वय २५ वर्ष, ५) सौ. गायत्री यादव, वय २८ वर्ष, ६) श्री. राजेंद्र कुमार यादव, वय ३५ वर्ष यांच्या आत्म्यास चिरशांती मिळावी ही ईश्वर चरणी प्रार्थना असा मी शोक प्रस्ताव मांडत आहे

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ - दु. १.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**